सं. क्र. १५८

REFBK-0000217

REFBK-0000217

# पंडिता रमाबाई

ह्यांचें

(पद्यात्मक लघुचरित्र.)

संपादक—"ख्रिस्ताश्रम."

## शंकर बळवंत कुळकर्णी

व

## मनोहर विठ्ठल तर्खडकर

ह्यांनीं केलें.

REFBK-0000217
REFBK-0000217

श्लोक.

ज्यानें अर्पियली तनू सकलही निंदा छळा सोसले ॥
ज्यानें जाण नरा तुझ्या स्वरुधिरें पापासि गा धूतलें ॥
पाहोनी पतिता करी रुदन तो दुःखें मनीं दाटला ॥
येशू तारक हा सरस्वति रमाबाईस कीं, लाभला ॥

मुंबई.

"निर्णयसागर" प्रेस.

१९०४.

किंमत १ आणा.

# श्रीमती पंडिता रमाबाई

ह्यांचें

पद्यात्मक लघु चरित्र.

ग्रंथ संग्रहालय २९८

आर्यावृत्त.

श्रीप्रभु हृदयांतरिं ये, त्वद्गुण वर्णन करावया शिकवीं ॥
सु–कवी गाया थकले, अल्पमती गाउनी तुला विनवीं ॥ १ ॥
मनुजापुढती तुमचें, तेज पडो दिवस यामिनी वदतों ॥
ऐसें सुकर्म व्हावें, ज्यानें प्रभु ख्रिस्त वंदिला जातो ॥ २ ॥
प्रभुख्रिस्तास्तव ज्यांनीं, तनु मन धन अर्पिलें जगामाजी ॥
ऐशा व्यक्ती असती, मूर्तिपरायण जनांत त्या गाजी ॥ ३ ॥
प्राचिन काळीं झाल्या, बहु अबला ह्या तरी सबल नाहीं ॥
ख्रिस्तपथीं ज्या असती, त्यांची इहपर जगांत हो ग्वाही ॥ ४ ॥
ऐशी साध्वी आहे, नाम जिचें **पंडिता रमाबाई** ॥
गातों चरित्र कवनीं, कविसंगें भरतभूमिका गाई ॥ ५ ॥
सत्सातिचरित्रश्रवणें, मनुजांना बोध होतसे चित्तीं ॥
ज्ञान मिळे ख्रिस्ताचें, तेणें हो देवनंदना महती ॥ ६ ॥
ज्या वर्षी संग्रामीं, श्रीलक्ष्मी राज्ञि झांशिची निजली ॥
शास्त्री अनंत यांना, कनक-कन्यका तदा पहा झाली ॥ ७ ॥
माताबंधुपित्यांसह, काननिं लघु बालिका सदा राहे ॥
होते आश्रमवासी, शांत निवासी परेश पथ पाहे ॥ ८ ॥
मुखमार्जनस्नानार्जन, समयोचित निरशनव्रतादिक तीं ॥
ऐशीं; निजसमजासम, मूर्तिपरायण कथानकें गाती ॥ ९ ॥
होता समय कठिण बहु, बंडानें लोक ग्रासिले कोठें ॥
राज्यें विलया गेलीं, काळानें स्वरुप दाविलें मोठें ॥ १० ॥
ऐशा दुःसह वेळीं, कन्या आली सुधन्य व्हायाला ॥
लक्ष्मी विलया गेली, परि आली ती रमा जगायाला ॥ ११ ॥

सुविद्य शास्त्रिबुवा हे, संस्कृत भाषज्ञ मायही होती ॥
दाक्षिण्यें शिकवाया, उभयजनें घेतलें तिला हातीं ॥ १२ ॥
प्रातःसमयीं उठुनी, माता दुहितेस गोड शब्दांनीं ॥
कुरवाळुनी करांनीं, प्रेमभरें बघतसे सुनयनांनीं ॥ १३ ॥
अर्धवट स्थितिच्या ज्या, आया निजलेंकरांस उंचरवें ॥
शिशुवपु मृदु भीववितीं, ताडिति जणुं श्वान भासतें धांवे ॥ १४ ॥
नरदारा जिथं ऐशा, संतत तेथें कुटुंबघात खरा ॥
ह्मणुनी प्रीतिलता ही, वाढविण्या ख्रिस्तकंद हस्तिं धरा ॥ १५ ॥
अनंत शास्त्री लक्ष्मी, बाइ उभय सुशिक्षित प्रेमनदी ॥
स्नान तियेंत करोनी, बनली ही पूर्ण संस्कृतीं उदधी ॥ १६ ॥
ऐशा परिश्रमातें, घेउनिया नेहमीं तिला शिकवी ॥
असुख परिक्षण आलें, जरि तरि तीं शिक्षणास ना चुकवी ॥ १७ ॥
अष्टादशवरुषांची, झाली कन्या सुविद्य जगतीं ही ॥
देवकरानें सबला, निजदेशोन्नतिस वाहिली पाही ॥ १८ ॥
देशा उन्नत करण्या, केवळ जगतीं स्त्रिया खऱ्या असती ॥
धन्या न काय होती, द्यावी कां ना तयांस हो महती! ॥ १९ ॥
नंतर दुष्काळानें, निजमुख पसरोनि उग्रता धरिली ॥
निर्धन सधन जनांना, भीतीनें व्यग्रता महा आली ॥ २० ॥
दुःखार्णविं लोकांमधिं, क्षुधित असें हें कुटुंब नित्य पिडे ॥
जिकडे जिकडे पळती, तिकडे हा काळ येउनीच भिडे ॥ २१ ॥
दुर्धर खडतर वेळीं, बंधु पिता माय सोडुनी जाय ॥
व्यसनें येतां पाठी, त्यजिती आप्तेष्ट वा तसे स्वकिय ॥ २२ ॥
नगरोनगरीं हिंडत, भारत रामायणें पुराणें तीं ॥
सांगत दंतकथांना, प्रस्फुट गीर्वाण वाणिनें गाती ॥ २३ ॥
धैर्यानें शौर्यानें, सोशियलें दुःख फार कीं विकट ॥
जग रान त्यांस झालें, मातृविना वाहि संसृती-शकट ॥ २४ ॥
ह्या काळानें सकलां, सोडुनि दिधलें, अनाथ बनवीलें ॥
मृदुतनु जाउनि तेथें, अस्थीचे पिंजरे पहा झाले ॥ २५ ॥
येती कलकत्याला, वक्तृत्वानें चहोंकडे ख्याती ॥
पसरे; श्रवणीं ज्यांच्या, ते ते कौतुक तिचें मुखें वदती ॥ २६ ॥

तत्कीर्ती परिसुनियां, सुज्ञ जनांनीं सभेंत बाहीलें ॥
पाहुनि ज्ञान तियेचें, पंडित ते थक्क होउनी गेले ॥ २७ ॥
पदवी 'सरस्वती' मग, देउनि सन्मानिलें तियेलागीं ॥
आर्या धन्य जहाली, तच्चरिता गावया प्रभो दे गी ॥ २८ ॥
नव्हती श्रद्धा धर्मी, कर्मठ तत्वें झुगारुनी दिधलीं ॥
ब्रह्मसमाजामाजी, शिरुनी वचनें तदा धरीयेलीं ॥ २९ ॥
अस्तिकमतद्वयाला, सोडुनि नास्तिक पथीं मती गेली ॥
'नन्ना नाना-नाना', देव नसे हींच कीं, मतें शिरलीं ॥ ३० ॥
बाबू बिपिन बिहारी, बंगाली सद्गृहस्थ हे ज्ञाते ॥
विद्वान् वकील तेथिल, नास्तिकमार्गांत तेहि कीं होते ॥ ३१ ॥
त्यांसह विवाह झाला, ना हिंदू वा समाज पंथाचा ॥
सरकारामधिं नोंदुनि, अनुभव घेती नवीन संसृतिचा ॥ ३२ ॥
ज्यावर प्रभु प्रीति करी, असल्या प्रत्येक पुत्र कन्येला ॥
फटके नाना देउनि, स्वकरें मग चालवी सदा त्याला ॥ ३३ ॥
एकुलता येशु खरा, तरि जगतास्तव समर्पिलें देवें ॥
ख्रिस्त सनातन वदतो, सोसुनि तूं शिष्य व्हावया यावें ॥ ३४ ॥
मरणावर जय मिळला, येशूख्रिस्ता; न अन्य व्यक्तीला ॥
मृत्यु न कोणा चुकवी, घेउनिया जाइ एक एकाला ॥ ३५ ॥
मरणें अवश्य आहे, देवाचा हा असे जगीं नियम ॥
"मरणें जिवंत होणें", मिळतें तेणेंच येशुचें धाम ॥ ३६ ॥
संसार थाटला परि, देवाची योजना दुजी होती ॥
योजी एक मनीं जन, होते मग गोष्ट आपुली भलती ॥ ३७ ॥
दश, नउ महिने केवळ, सौख्याब्धीं उभय राहतां धाले ॥
कन्यारत्न तयांना होउनि, मग काय दुःख कोसळलें ॥ ३८ ॥
रुग्णाऽवस्था आली, हलुक तनु होय कॉलऱ्यानें ती ॥
केले उपाय आतिशय थकले, मुळिं त्यांस नाहिं गुण येती ३९ ॥
झालें निधन पतीचें, शोकानें भग्न जाहलें हृदय ॥
विधवा अनाथ यांचें, रक्षण करि देव होउनी सदय ॥ ४० ॥
अभिधान कन्यकेचें, ठेउनि दिधलें मनोरमा पाही ॥
वैधव्य प्राप्त झालें, तेणें दुःखार्णवीं रमाबाई ॥ ४१ ॥

नामी रूथ बघाया, वाचूं आपण पवित्र शास्त्रीं या ॥
कथिलीं कथानकें जीं, आली पाहूनि तीं सबळ व्हाया ॥ ४२ ॥
ऐशी रमा-मनोरम, माय सुता ही धरेवरी राहे ॥
कन्येसह फिरली परि, आश्रय नाहीं तसें कुणी पाहे ॥ ४३ ॥
पाहुनि विधवा असुखें, सम स्थिति मनिं आणुनी करी दुःख ॥
सुचला उपाय तेव्हां, स्थापुनि 'महिलासमाज' होय सुख ॥ ४४ ॥
वक्तृत्वानें सकलां, महिलांची ती विपन्न स्थिति दावी ॥
अबलां शिक्षणशाला, अंतरिं होतें किं स्थापिता व्हावी ॥ ४५ ॥
तदनुसार प्रयत्ना, चालविलें फार धैर्यशीलेनें ॥
अबलोन्नतीस झटली, श्रमली-फिरली बहूत नेटानें ॥ ४६ ॥
झिजवीलीं अति काया, परि ये त्यांची दया न कवणाला ॥
न मिळे कपर्दिका ती, कोणि पुसेना तसेंच बोलाला ॥ ४७ ॥
यांचा केली बहुतर, देती वचनें सुशुष्क शब्दांनीं ॥
करणी कारें न करिती, व्यर्थ "वाहवा" न अर्थ वदनांनीं ॥ ४८ ॥
शूर खरी धवला ही, डगमगली मनिं न ती पुढाकारी ॥
सत्कृत्य करायाला, आर्यमहीलेस देव साह्य करी ॥ ४९ ॥
देव असे ज्या साथी, संकटिं दे त्यास आपुला सु-कर ॥
आशीर्वचनें देई, वांकविती जे तयापुढें शीर ॥ ५० ॥
पुत्र पिता येशू हा, पवित्र आत्मा वसे सदा हृदयीं ॥
तैशा बंधुभगिनिंच्या, भेटी घेऊनि हेतु ती कळवी ॥ ५१ ॥
विधवांच्या कार्याला, झाला आरंभही चरित्राला ॥
अब्राहाम निघाला, देवाज्ञेनें जसा प्रवासाला ॥ ५२ ॥
कोठें जावें न कळे, काय करावें परंतु तो गेला ॥
तैसा लघु कन्येसह, विलायतेचा विचार मनिं झाला ॥ ५३ ॥
ईशें धन देओनी, दूर प्रदेशीं तियेस नेवविलें ॥
सागरप्रवास दुःसह, दुर्घट पथ साच त्यांस अनुभवलें ॥ ५४ ॥
पाहुनि इंग्लिश रीती, सभ्यपणा न्याय नीति जेथ वसे ॥
गृहस्थिति अवलोकुनिया, सुतत्व धर्मांत जें प्रगल्भ असे ॥ ५५ ॥
प्राधान्य गोष्ट ही कीं, मानव सन्मान दे स्त्रियांस पहा ॥
सुवर्णभूमीवरती, अबला केवळ खरासमान अहा ॥ ५६ ॥

व्याख्यानमालिकेनें, आंग्लांना दाविलें खरें गूज ॥
अवनत दशा बघोनी, विधवांची दाद लावुं या आज ॥ ५७ ॥
पति गत झाल्यावरती, विधवेचें मुख विलोकि ना लोक ॥
दुःश्चिन्ह गमे त्यांना, आश्रय द्याया न मारिती हाक ॥ ५८ ॥
साध्वीचे रव ऐकुनि, परदेशिय बंधु भगिनि कळवळले ॥
अंतरिं दुःखित झाले, त्यासाठीं देव-पुत्र आळविले ॥ ५९ ॥
कृत्रिम धर्म जनानें, आक्षेपानें तियेस सोडीले ॥
परि त्या बळकट केलें, सत्यपणानें प्रमाण पटवीलें ॥ ६० ॥
परदेशाटन करुनी, विद्यासंपन्न जाहली माता ॥
शोकानल विधवांचा, वर्णाया लेखणी धरी हातां ॥ ६१ ॥
वर्णीतसे स्त्रियांची, स्थिति अधमाधम स्वतांच जी साहे ॥
श्रेष्ठ ज्ञातींतिल ज्या, हिंदूबाला गृहीं सतत राहे ॥ ६२ ॥
मार्जनिसमान त्यांनीं, गेहीं राहुनि शरीर झिजवावें ॥
कष्ट कराया कटुवच, निर्दय नर बोलती तया भ्यावें ॥ ६३ ॥
चाल असे निजदेशीं, घातक जी कीं सुरीच हृदि साची ॥
अल्पवयीं लग्नाची, तेणें संख्या उणी न विधवांची ॥ ६४ ॥
आश्चर्या कृति जाणा, एक मनुज बायका बहू करितो ॥
लघु मुलिचा पति मरतां, तिजवरती दुःखलोट कोसळतो ॥ ६५ ॥
देशांतर करण्याला, द्वीप पहाया सतीस इंग्लंड ॥
भूपृष्ठीं पाताळीं, नाम जयाचें अमेरिका खंड ॥ ६६ ॥
सत्य प्रमाण देउनि, आर्यें केलें तयांस अति तप्त ॥
स्थलसंकोचास्तव हें, आह्मीं केलें चरित्र संक्षिप्त ॥ ६७ ॥
प्रसंग परमेशानें, दिधला ह्मणुनी सुयोग हा जुळला ॥
पौलासम खडतर त्या, जाचा साहुनि समाज मेळाविला ॥ ६८ ॥
ख्रिस्त दयेचा कर तो, आंग्लसमाजीं प्रकाश येशूचा ॥
कर्में त्यांचीं बघतां, महिमा होतो खचीत देवाचा ॥ ६९ ॥
वेदादी षड्शास्त्रें, सद्गुरु उपगुरु बहूत पाहीले ॥
ग्रंथांतरीं विलोकी, तारण ना त्यांत हें खरें कळलें ॥ ७० ॥
तारक येशू आहे, सर्वांना वंद्य शास्त्र सांगतसे ॥
अनुभव साच मिळाला, तेव्हां विश्वास त्यावरीच बसे ॥ ७१ ॥

दीर्घ प्रयत्न करुनी, मेळविलें ज्ञान आंग्लभाषेचें ॥
झालें सहाय तेणें, निज मत सांगावया विचाराचें ॥ ७२ ॥
"उच्चज्ञातीविधवा" यावरि लिहिला सुग्रंथ हा पहिला ॥
झाला सुमान्य सकलां, तेणें मानार्ह होय ही महिला ॥ ७३ ॥
जिकडे तिकडे ख्याती, पसरुनि गेली; तियेवरी प्रीती ॥
बसली आंग्लस्त्रियांची, पत्रीं लघुवर्णनें तिचीं लिहिती ॥ ७४ ॥
प्रस्फुट व्याख्यानानें, अबलांची जाहली स्थिती उघडी ॥
तेणें द्रव येओनी, आश्रय मिळला तियेस त्याच घडीं ॥ ७५ ॥
शास्त्रीं मन बहु रमलें, सत्याचे मार्ग त्यांत सांपडले ॥
अवतार येशु साचा, आशा-विश्वासपात्र हें मिळलें ॥ ७६ ॥
बापाच्या पुत्राच्या, आत्म्याच्या ह्या तिघांस मिळवूनी ॥
बाप्तिस्मा घेओनी, प्रियकन्या जाहली प्रभूचरणीं ॥ ७७ ॥
ख्रिस्त प्रकाश ज्यांना, मिळतो ते जन्मती पुन्हा साच ॥
पापें धुवून जाती, येशू रक्तीं न होय तो नीच ॥ ७८ ॥
येती हिंदुस्थानीं, विधवांचें कीं स्वरूप बदलाया ॥
अश्रांत श्रम करण्या, अर्पण केली सदा पहा काया ॥ ७९ ॥
ऐशा गतधव बाला, पाहुनिया स्वांत फार कळवळलें ॥
तेणें अस्तित्वामधि, विधवांचें "**शारदासदन**" आलें ॥ ८० ॥
प्रथमाऽरंभीं सदनीं, दोन मुली घेउनी सुधाराया ॥
ज्ञानामृत पाजाया, केला आरंभ; लागतों गाया ॥ ८१ ॥
हिंदू शास्त्रें शिकती, 'तुळशीला' वारि घालिती नमुनी ॥
प्रतिबंध तो नसे त्यां, वाचिति रामायणें मुली 'सदनीं' ॥ ८२ ॥
त्रिकाल ख्रिस्ती शास्त्रा, संतत वाचावया रमाबाई ॥
निजखोलीमधिं जाई, येशू तारक खरा तया ध्यायी ॥ ८३ ॥
विधवाविद्यालयेंची, सत्कीर्ती पसरली महाराष्ट्रीं ॥
ऐकुनि सुधारकांनीं, पत्रीं दिधली सु-साक्ष परराष्ट्रीं ॥ ८४ ॥
वाढत वाढत गेलें, विद्यालय शिक्षणीं तसें धर्मी ॥
पौराणिक विश्वासा, त्यजुनि बालिका बघे तिच्या कर्मी ॥ ८५ ॥
वर्तन ख्रिस्ति जिण्याचें, नीट असे धीट ही खरी साध्वी ॥
तेणें प्रभा फांकली, सदनीं येशूस बालिका गाई ॥ ८६ ॥

प्रकोपला अघचालक, पाळक असती तयांस गडबडवी ॥
धर्म बुडाला मुलिंना, आणा गृहिं लोक बोलती पाही ॥ ८७ ॥
जग देहा सैताना, नाकाराया प्रभू सदा सांगे ॥
हें ब्रिद जेथ वसतें, दाविति ते पंडिता रमा अंगें ॥ ८८ ॥
केसरि–सुधारकांनीं, जगद्धितेच्छू अनेक त्या कालीं ॥
धैर्या धरुनी शौर्यें, जरि जाचविलें तरी न घाबरली ॥ ८९ ॥
"आतां काय करूं मी" ऐसा संशय कधीं नये तिजला ॥
उसळति कुयुक्ति लाटा, चालक खिस्त प्रसाद तो झाला ॥ ९० ॥
मध्य प्रांतामाजी, दुष्काळानें मुखास दावीलें ॥
हाहाकार उडाला, भीतीनें त्रस्त लोक बहु झाले ॥ ९१ ॥
सरकारानें केलें, मिशनेरीनें उपाय योजीले ॥
काळ–ग्रस्त जनांना, मृत्यूंतुनि प्राण जीव ते दिधले ॥ ९२ ॥
ऐकुनि वार्ता ऐशी, कळवळलें चित्त प्रीतिनें जाती ॥
जमविति विधवा लघुलघु, तैसीं तीं अर्भकेंच वांचविती ॥ ९३ ॥
भयदस्थिति बघुनीयां, पाषाणां प्रीतिचे झरे फुटती ॥
वर्णन करवत नाहीं, कविता--स्फूर्ती न कल्पना वदती ॥ ९४ ॥
आणुनिया हीं बाळें, लालन पालन सदा स्वयें करिती ॥
चिंता निशिदिनिं त्यांची, रक्षाया देवबाप विनवीती ॥ ९५ ॥
तेथुनि काळ निघाला, मोर्चा निज लावि गुर्जर प्रांतीं ॥
दाणादाण उडाली, गुर्जर जन काय बापुडे करिती ॥ ९६ ॥
तात मुलां न पुसे मुळिं, पति निज स्त्रीयेस टाकुनी देती ॥
पशु पक्षी तडफडती, व्याकुळ होऊनि प्राण टाकीती ॥ ९७ ॥
मार्गावरती दिसती प्रेतांचे ढीग, अस्थिचे पिंजरे ॥
भासे स्मशानभूमी, दिसती ना रम्य होति जीं शहरें ॥ ९८ ॥
माता होउनि त्यांची, अंकीं घेऊनियां तयां पाहीं ॥
मलिन रुधिर गळतें तें, वमनाचे डाग ही किती साही ॥ ९९ ॥
वस्त्रें सावरुनी तीं, आणितसे लेंकरांस मुक्तिमधीं ॥
खाणें पिणें न समयीं, विश्रांती ना मिळे तियेस कधीं ॥ १०० ॥
बालपणीं वनिं जीचा, देवें संभाळ करुनि उपयोगा ॥
जें वन अनुभवलें तें, मुक्तीची जाहली तदा जागा ॥ १०१ ॥

## श्लोक.

होतें पूर्वि जिथें भयाण वन तें त्या बाभळी उंचशा ॥
कोल्हे श्वान जिथें रहात तिकडे दैदीप्य झाल्या दिशा ॥
गेलें तें वन पूर्विंचें उपवना स्थित्यंतरा पावलें ॥
वाटे एदन बाग रम्य सजला तें चित्त नादावलें ॥ १०२ ॥
होत्या जेथ लहान सान भयदा ओसाड त्या झोंपड्या ॥
तेथें भव्य मधुगृहें उभरलीं त्या मोडल्या बापुड्या ॥
जेथें वृश्चिक क्रूर सर्प वनिंचे वस्तीस होते अती ॥
तेथें राहाति गोडगोड प्रभुचीं तीं बालकें संप्रती ॥ १०३ ॥
जागोजागिं तरूलता उगवल्या तीं फुल्ल झालीं सुमें ॥
नानाचित्र विचित्र रंग बघुनी हो चित्त तेव्हां रमे ॥
पाषाणांचिं गृहें सुरेख दिसती तीं भासती आश्रम ॥
चारू सुंदर बालिका बघुनियां जाती तदा विश्रम ॥ १०४ ॥
देवाचें मधु तेज तें पसरिलें त्या मुक्तिच्या आश्रमीं ॥
वाटे कीं अघ मुक्त होउनि अतां आहेच ख्रिस्ताश्रमीं ॥
तेणें शांति, दया अमूप सकलां येशूमुळें लाधली ॥
तो आनंद न वर्णवे ! तव कृपा सत्या ! अम्हां पावली ॥ १०५ ॥

## आर्या.

ह्या मायेला आतां, सज्जन हो दोन कन्यका असती ॥
नाम तयांचें ऐका, अग्रज ही **शारदा** दुजी मुक्ती ॥ १०६ ॥
नांदति एका स्थानीं, भक्ति प्रीति तिथें असे शुद्ध ॥
ठाव मिळे तो कैचा, अघजनित्याची गळे पळे बुद्ध ॥ १०७ ॥
या दोघींस पहाया, निजकन्या ती मनोरमाबाई ॥
अश्रांत श्रम करिते, आईच्या सांगण्याप्रमाणें ही ॥ १०८ ॥
जगदीश्वर देवानें, आम्हांकरवीं करोनि हें काव्य ॥
उपकृति मानुनि चरणीं, संपवितों तूर्त चरित हें भव्य ॥ १०९ ॥
आयुर्बल वित्ताचा, कर येशू दे तयांस आज–पुढें ॥
विनती लीन मनानें, ख्रिस्तानांवें प्रभो तुझ्याच पुढें ॥ ११० ॥

२९८